साक्षीदार क्र **०२** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–ज्ञानेश्वर तुकारामजी वावधने
वय ६० वर्ष, व्यवसाय–सेवानिवृत्त ग्रामसेवक.
राह.हिंगणघाट,तह.हिंगणघाट, जि.वर्धा.

**<u>सरतपासणी सरकारी वकील श्री.जे.एम.बोरकर यांच्या मार्फत</u>**

१. दि.२७/०८/२०१८ ला मी ग्रामपंचायत पिपरा येथे ग्रामसेवक म्हणुन कार्यरत होतो. सदर दिवशी आम्ही आमच्या ग्रामपंचायतमार्फत सरपंच ,उपसरपंच व शिपाई यांच्यासह ज्या ठिकाणी अतिक्रमण झाले होते त्या ठिकाणी मोका चौकशी करण्यासाठी गेलो होतो. त्यानंतर आम्ही ग्रामपंचायतच्या मार्फत मोका चौकशीसाठी अतिक्रमण जागेचे मोजमाप घेण्याकरिता गेलो असता अनिकेत मेंघरे यांनी माझ्या अर्जाचे काय झाले आहे याबाबत विचारणा केली आणि वादविवाद सुरू केला. त्यावेळी सकाळी ११.३० चा वेळ होता आम्ही मोजमाप चालु केले तर त्यांनी आमच्यासोबत वादविवाद केला त्यानंतर पाउस सुरू असल्यामुळे आम्ही पोलिसांना अगोदरच तक्रार केली होती की, तुम्ही येथे हजर राहा. त्यानंतर पोलिस आले त्या जागेचे त्यांच्यासमक्ष मोजमाप केले आणि पाउस सुरू असल्यामुळे आम्ही तेथुन दुस–या ठिकाणी परत गेलो. त्यानंतर पंचनामा केला. पोलिसांना मी बयाण दिले होते. पोलिसांनी मला पंच म्हणून हजर राहण्यासाठी समन्स पत्र दिले होते. आता मला समन्स पत्र दाखविण्यात आले त्यावर माझी सही आहे त्यातील मजकुर त्यातील मजकुर बरोबर आहे. सहीला **निशानी क्र.२४** देण्यात आला. पोलिसांनी मला घटनास्थळावर बोलवले होते. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानी क्र.२५** देण्यात आला. न्यायालयामध्ये हजर असलेल्या आरोपींना मी ओळखतो त्यांनी मला मोजणीसाठी अर्ज दिला होता ते तेच आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>आरोपीतर्फे ॲड.ए.बी.पोंगळे यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

२. हे म्हणणे खरे आहे की, देवराव मेंघरे यांनी गावातील रोडवर अतिक्रमण केले आहे याबाबत आरोपींनी व गावातील इतर लोकांनी तक्रार अर्ज केला होता. हे म्हणणे खरे आहे की, सदर रोड हा आरोपीचा व गावातील इतर लोकांचा शेतीकडे जाण्याचा वहीवाटीचा रोड होता. हे म्हणणे खरे आहे की, देविदास मेंघरे याने रोडवर अतिक्रमण केल्यामुळे आरोपींना व गावातील लोकांना सदर रोडवरून जातांना त्रास होत होता त्यामुळे गावातील लोकांनी तक्रार अर्ज दाखल केला होता. सदर तक्रारीवरून दि.२७/०८/२०१८ रोजी मोक्यावर मोजणीकामी दिवस निश्चित केला. सदर

मोजणीच्या दिवशी गावातील सरपंच,उपसरपंच,सदस्य व कर्मचारी इ.लोक उपस्थित होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर मोजणी केल्यानंतर देविदास मेंघरे याने रोडवर अतिक्रमण केल्याचे निष्पन्न झाले. हे म्हणणे खरे आहे की, त्यानंतर आम्ही देविदास मेंघरे यांना रोडवरिल अतिक्रमण काढण्यास सांगितले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळी देविदास मेंघरे, शालिनी मेंघरे व अनिकेत मेंघरे हे वादविवाद करण्यासाठी तेथे आले. हे म्हणणे खरे आहे की, ज्या ठिकाणी वाद सुरू होता तेथे पाउस चालु असल्यामुळे चिखल झाला होता व तेथेच बाजुला नाली होती.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
दि ०१.०२.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड